# जिल्हादंडाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद

(उपचिटणीस शाखा)

दुरध्वनी क्रमांक 02472-227301 Email ID- rdc1osmanabad@gmail.com


वाचा:- 1. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 13 मार्च 2020.

2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 14 मार्च 2020.

3. आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 30, 33, 34, 41 व कलम 51.

4. भारत सरकार, गृह मंत्रालय, यांचे आदेश क्र. 40-3/2020-डीएम-1(ए) दिनांक 29 जुलै 2020.

5. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, अधिसूचना क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दि. 29 जुलै 2020.

6. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26 दि. 02.08.2020.

---

क्र.2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26 दिनांकः- 10 /08/2020.

विषय:- कोरोना 19 विषाणुमुळे उध्दभवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव रोखण्याचे दृष्टीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याकरिता व त्यावर नियंत्रण आणण्यासाठी उस्मानाबाद जिल्हयातील परंडा नगर पालिका क्षेत्रात दिनांक 13/08/2020 रोजीच्या 00.00 वाजेपासुन दिनांक 20/08/2020 रोजीच्या मध्यरात्री 12.00 वाजेपर्यंत फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 (1) (3) अन्वये संचारबंदी लागु करणे बाबत.

आदेश :-

ज्याअर्थी उपरोक्त वाचा क्र. 2 चे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" प्रसिद्ध केले असून यातील नियम क्र. 3 नुसार करोना विषाणुमुळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी कोरोना विषाणू कोविड-19 चा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात विविध प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येत आहेत. त्याअनुषंगाने संदर्भ क्र. 5 वरील आदेशान्वये शासनाने संपुर्ण राज्यात लॉकडाऊन दि. 31/08/2020 रोजीच्या मध्यरात्रीपर्यंत वाढविण्यात आलेला आहे. तसेच उपरोक्त संदर्भ क्र. 5 नुसार लॉकडाऊन मधील निर्बंधाची सुलभता आणि लॉकडाऊन टप्पानिहाय उघडणे (Easing of restrictions and phase wise opening of lockdown Mission Begin Again) बाबत मार्गदर्शक सुचना निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार संदर्भ क्र. 6 अन्वये या कार्यालयाने आदेश पारित केलेला आहे.

ज्याअर्थी, उस्मानाबाद जिल्हयातील परंडा नगर पालिका क्षेत्रात कोरोना विषाणू कोविड-19 या विषाणुचा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे व त्यावर नियंत्रण आणण्याची कार्यवाही करणे आवश्यक झाले आहे. त्याकरिता कोरोना कोविड-19 विषाणुचा प्रसार थांबविण्यासाठी परंडा नगर पालिका क्षेत्रात संचारबंदी लागू करणे आवश्यक झाले असल्याची माझी खात्री झाली आहे.

Scanned by CamScanner

त्याअर्थी मी दिपा मुधोळ-मुंडे, जिल्हादंडाधिकारी उस्मानाबाद फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 (1) (3), साथरोग अधिनियम 1897 च्या कलम 2 आणि आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 च्या सर्व संबंधित तरतुदी अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करुन उस्मानाबाद जिल्हयातील संपुर्ण परंडा नगर पालिका क्षेत्रात दिनांक 13/08/2020 च्या 00.00 वाजेपासुन ते 20/08/2020 च्या मध्यरात्री 12.00 वाजेपर्यंत संचारबंदी लागु करीत आहे. या कालावधीत नागरीकांना अनावश्यकरित्या घराबाहेर पडण्यास सक्त मनाई करण्यात येत आहे. या कालावधीत करोना विषाणूचा (COVID-19) होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधक उपाययोजनेचा एक भाग म्हणून नागरिकांची एका ठिकाणी होणारी गर्दी टाळण्यासाठी उस्मानाबाद जिल्हयातील परंडा नगर पालिका क्षेत्रातील खालील आस्थापना वगळून उर्वरित आस्थापना बंद राहतील.

1) फिरते दुध विक्रेते यांच्या मार्फत घरपोच दुध / दुध पाकीटांची विक्री / वितरण करता येईल परंतु एका ठिकाणी उभे राहुन दुध विक्री करता येणार नाही. घरपोच दुध / दुध पाकिटे वाटपाच्यावेळी कोरोना विषाणू कोविड-19 च्या अनुषंगाने सामाजिक अंतराचे पालन करावे. तसेच घरपोच दुध विक्रीची वेळ सकाळी 7.00 ते 10.00 पर्यंत राहील.
2) सर्व सरकारी व खाजगी रुग्णालये, दवाखाने व त्यांचेशी संलग्न मेडीकल स्टोअर्स चालू राहतील.
3) जार, वॉटर सप्लायर्स यांनी पाणी जारव्दारे वाटप न करता ग्राहकांकडील उपलब्ध भांडयामधे पाणी दयावे आणि त्यावेळेस सामाजिक अंतराचे पालन करावे. किंवा जार, वॉटर स्पलायर्स यांनी संपुर्ण जार ग्राहकास द्यावे व रिकामी जार परत न नेता त्याच जारमध्ये पुनर्भरणाची घरपोच सेवा द्यावी व सर्व जार, वॉटर सप्लायर्स कर्मचारी यांना त्यांचे ओळखपत्राआधारे परवागनी राहील.
4) घरगुती गॅस घरपोच सेवा देतांना गॅस कंपनीचा गणवेश परिधान करावा व त्यांचे गणवेश नसलेल्या कर्मचारी यांनी ओळखपत्र सोबत ठेवावे.
5) वर्तमानपत्रे व माध्यमांविषयक सेवा चालु राहतील.
6) सर्व शासकीय कार्यालय व केंद्र शासनाचे सर्व विभागांची कार्यालये सुरु राहतील. या कार्यालयाचे / विभागांचे कर्मचारी कार्यालयीन ओळखपत्राव्दारे नगर पालिका क्षेत्रात प्रवास करु शकतील. संचारबंदीच्या कालावधीत अत्यावश्यक शासकीय कार्यालये वगळता इतर शासकीय कार्यालयांतील कर्मचा-यांची उपस्थिती 10 % राहील.
7) दिवाणी व फौजदारी न्यायालय परंडा येथील न्यायालयीन कामकाजास परवानगी राहील.
8) परंडा नगर पालिका क्षेत्रातील नागरीकांना इतर जिल्हयात व राज्यात जाण्यासाठी ऑनलाईन पास मिळणार नाही. तथापी अत्यावश्यक सेवा, वैद्यकीय कारण किंवा अंत्यविधीसाठी परवानगी देण्यात येईल. यासाठी नागरीकांनी www.covid19.mhpolice.in या संकेतस्थळावर अर्ज करावा.
9) परंडा नगर पालिका क्षेत्रातील सर्व नागरीकांनी कोरोना विषाणुचे अनुषंगाने (ताप,सर्दी,खोकला, डोकेदुखी व श्वसनास त्रास इ.) लक्षणे आढळुन आल्यास नजीकच्या शासकीय रुग्णालयात तपासणी करुन घ्यावी.
10) विद्युत सेवा, मोबाईल व दुरसंचार सेवा पुरविणा-या कंपन्या, आस्थापना व त्यांचे कर्मचारी वाहनांना ओळखपत्राआधारे परवानगी राहील.
11) अंत्यविधीसाठी 10 व्यक्तींना उपस्थित राहण्याची परवानगी राहील.
12) पेट्रोल / डिझेल पंप फक्त अत्यावश्यक सेवा, मिडीया व वैद्यकीय सेवा देणा-या कर्मचा-यांचा वाहनांना व शासकीय वाहनांसाठीच सकाळी 9 ते दुपारी 12 या वेळेत सुरु राहील. ओळखपत्राची पडताळणी करुनच पेट्रोल / डिझेल वितरित करण्यात यावे. पेट्रोल / डिझेल पंपावर काम करणा-या कर्मचा-यांना पेट्रोल / डिझेल पंप चालकांनी दिलेल्या ओळखपत्राआधारे परवानगी राहील.
13) पिककर्ज व अंतर्गत कामकाजाकरिता सर्व बँका सकाळी 9 ते दुपारी 2 या वेळेत सुरु राहतील.

Scanned by CamScanner

14) प्रशासनाच्या पुर्व परवानगी शिवाय कोण-याही धार्मिक/यात्रा/मेळावे/लग्न समारंभ/विविध प्रकारचे प्रदर्शने/आठवडी बाजार/जनावरांचे बाजार भरविणे इ. आयोजन करण्यास मनाई करण्यात येत आहे.

15) संचारबंदीच्या कालावधीत सर्व आस्थापनांनी कोविड-19 चे संसर्गाच्या तपासणीचे अनुषंगाने प्रशासनामार्फत रॅपिड अँटीजेन टेस्ट करुन घ्यावी.

सदरील आदेशाची कडक अमलबजावणी सर्व संबंधित यंत्रणांनी करावी. कुठल्याही व्यक्तींकडुन या आदेशातील सुचनांचे उल्लंघन झाल्यास त्यांचेविरुध्द आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 च्या कलम 51 ते 60 व भारतीय दंड संहिता कलम 188 नुसार कायदेशीर कारवाईस पात्र राहील. तसेच अन्य कायदेशीर कारवाई देखील केली जाईल.

सदरचा आदेश आज दि. 10 /08/2020 रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिला आहे.

10/8/20

(दिपा मुधोळ-मुंडे)

जिल्हादंडाधिकारी उस्मानाबाद तथा अध्यक्ष,

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद

प्रत:- मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

प्रत:- आवश्यक कार्यवाहीसाठी

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
2. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद.
3. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, उस्मानाबाद.
4. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि. प. उस्मानाबाद.
5. अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, उस्मानाबाद.
6. जिल्हा प्रशासन अधिकारी, न. पा. प्र. जि. का. उस्मानाबाद.
7. व्यवस्थापक, जिल्हा अग्रणी बँक, उस्मानाबाद.
8. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद.
9. विभाग नियंत्रक, रा. प. मंडळ, उस्मानाबाद.
10. उपविभागीय अधिकारी तथा INCIDENT COMMANDER सर्व जि. उस्मानाबाद.
11. सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, उस्मानाबाद.
12. तहसिलदार तथा INCIDENT COMMANDER सर्व जि. उस्मानाबाद.
13. मुख्याधिकारी नगर परिषद / नगर पंचायत सर्व जि. उस्मानाबाद.
14. वैद्यकीय अधीक्षक, उपजिल्हा रुग्णालय, परंडा.
15. सर्व संबंधितांस अनुपालनास्तव.

10/8/20

जिल्हादंडाधिकारी उस्मानाबाद तथा अध्यक्ष,

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद

DISTRICT MAGISTRATE
OSMANABAD

Scanned by CamScanner